माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम-१९५/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. प्रमोद दत्ताराम चव्हाण**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
प्रा.अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व)
मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (उपजिल्हाधिकारी कक्ष)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
प्रा.अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व)
मुंबई -४०० ०५१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००२१५६ प्रकरणी आयोगाने दि.२३.०३.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांनी माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. २०.०५.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. १९.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगास अहवाल अप्राप्त आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेशाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

..२/-

४. सदर प्रकरणी पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष), मुंबई शहर, झोपुप्रा, मुंबई- ५१ यांचीही उपस्थिती आवश्यक आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.०४.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०२.०४.२०२६**

2-4-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत:- जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष), मुंबई शहर, झोपुप्रा, मुंबई- ५१.

**रामाआ-तक्रार क्र.बीएम- १९५/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. प्रमोद दत्ताराम चव्हाण,**

**सुनावणी दिनांक : १७.०४.२०२६ (In continuation of order dt ०२.०४.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेशाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष), मुंबई शहर, झोपुप्रा, मुंबई - ५१ यांचीही उपस्थिती आवश्यक आहे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष), मुंबई शहर, झोपुप्रा, मुंबई - ५१ अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेशाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. तसेच जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष), मुंबई शहर, झोपुप्रा, मुंबई - ५१ यांनी पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०७.०५.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 17-4-2026

**मुंबई**
**दिनांक : १७.०४.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**